10

# आरक्षण धोरण आणि सामाजिक न्याय

डॉ. विलास भगवानराव भिल्लारे
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, जि. बीड

## Research Paper - Sociology

जपानमधील सानुराई लोकांनी जन्माने मिळणारा उच्च दर्जा सोडून दिला. त्यामुळे जपानमध्ये एकात्म भावना विकसित झाली आणि त्या देशाची अल्पावधीत उन्नती घडून आली. तसेच भारतीय समाजाने आपल्या समाज मनातील जातिभेदाची विषवल्ली संपूष्टात आणली पाहिजे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज (२६ जुलै १८७४-६ मे १९२२) यांचे विचार व कर्तृत्व समाज सुधारणेसाठी मार्गदर्शक, दिशादर्शक व प्रेरणादाई ठरते. २ एप्रिल १८९४ ते ६ मे १९२२ य कालावधीतील त्यांची अठ्ठावीस वर्षाची राजवट वैशिष्ट्यपुर्ण, संस्मरणीय व दुरगामी परिणा करणारी ठरली. कारण त्यांनी आपल्या राजसत्तेचा उपयोग माणसाला माणून म्हणून सन्माना जीवन जगता आले पाहिजे, यासाठी केला. जगामध्ये अनेक राजे, सम्राट झाले परंतु सामान माणसावर प्रेम करणारे आणि सामान्य माणसाचे प्रेम लाभलेले राजे फार कमी झाले. त्यापैकी शा महाराज एक होते. ते राजांतील थोर माणूस होते आणि माणसातील थोर राजे होते. एवढेच का ते राजा, छत्रपती, समाजसुारक, लोकनेता यापेक्षा इतिहासाला कलाटणी देणारे महान समाजपुर होते. या अनुषंगाने दुय्यम सामग्रीच्या आधारावर पुढील उद्दिष्टांन अनुसरुन प्रस्तुत विवेचन के आहे.

१. शाहू महाराजांच्या विचार कर्तृत्वाचा आढावा घेणे.
२. शाहू महाराजांचे आरक्षण धोरण समजून घेणे.
३. आरक्षणाचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून आढावा घेणे.
४. आरक्षणाबद्दलच्या अनुकूल-प्रतिकूल विचाराची चिकित्सा करणे.
५. वर्तमान स्थितीच्या संदर्भात आरक्षणाची उपयुक्तता लक्षात घेणे.

महाराष्ट्रात सहकार चळवळ, सत्यशोधक चळवळ, ब्राह्मणेत्तर चळवळ, अस्पृश्यता निर्मूलन चळवळ, बहुजन समाज चळवळ इत्यादी सारख्या ज्या समाजसुधारणाच्या चळवळी घडून आल्या. त्यात शाहू महाराजाचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मौलिक योगदान राहिले आहे. त्यामुळे त्यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष करणे हा सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने निव्वळ कृतघ्नपणाचे ठरेल हे सांगताना प्रा.न.र. फाटक म्हणतात, "महाराष्ट्रामधल्या गेल्या शंभर सव्वाशे वर्षाचा इतिहास जर आपण पाहायला लागलो तर त्यामध्ये विचार करण्यासारख्या कर्तबगारीची जी काही माणसे होऊन गेली त्यामध्ये कोण्याही माणसाला कितीही त्यांचा विरोध असला तरी शाहू महाराजांचे नाव गाळता येईल असे मला वाटत नाही." कारण त्यांचे कार्य कोणत्याही एका विशिष्ट वर्गापुरते मर्यादित नव्हते तर समाजाच्या सर्व थरातील लोकांना सामावून घेणारे होते. तसेच ते कार्य जीवनाच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रशासकीय आदी क्षेत्रात पसरले होते.

"अस्पृश्यता निवारण, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, विद्यार्थी वसतिगृहाची अभूतपुर्ण योजना, धरणे बांधून हरितक्रांतीच्या दिशेनं केलेली वाटचाल, मल्लविद्येला दिलेले उत्तेजन, चित्र, संगीतादी ललित कलांना व कलावंताना दिलेला राजाश्रय, रंगभूमीच्या विकासार्थ केलेले प्रयत्न, राजयकारभारात कामगारांना प्रतिनिधित्व मिळावे म्हणून रशियन राज्यक्रांतीच्या पार्श्वभूमीवर संघटना बांधण्याबद्दल महाराजांनी कामगारांना दिलेली चालना इत्यादी महाराजांची विविध क्षेत्रातील कार्ये पाहिली म्हणजे हा राजा समग्र क्रांतीच्या (Total Revolution) पुरस्कर्ता होता, हे दिसून येईल. त्यांनाही स्वराज्य हवे होते, परंतु ते केवळ परकीयापासूनचे नव्हे तर स्वकीयापासूनही हवे होते. यासंदर्भात ते २७ डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथे आयोजित केलेल्या अकराव्या आखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले, "आम्हाला स्वराज्य पाहिजे. केवळ अल्पसंख्य उच्च वर्गीयांच्या हातातच सत्ता जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षापर्यंत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याचे आम्हाला शिक्षण मिळेल. या जाणिवेतून त्यांनी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. या मागणीवरुन त्याचे दृष्टपणे लक्षात येते."

शाहू महाराजांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त २६ जुलै १९९२ रोजी कानपूर येथील 'अखिल भारतवर्षीय कूर्मी क्षत्रिय महासभेने शाहू: संघर्ष एवं सृजन' नावाचा गौरवग्रंथ प्रकाशित केला. प्रसिद्ध चरित्रकार प्रा.डॉ. ब्रजलाल वर्मा हे या गौरवग्रंथाचे मुख्य संपादक आहेत. शाहू महाराजांनी सामर्थ्यशाली व बलशाली समाज बांधणीसाठी सामाजिक न्यायाला अनन्यसाधारण महत्व दिले. याबाबत गौरवग्रंथातील संदेशात माजी पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह म्हणतात, "महात्मा जोतिराव फुले एवंम् श्रद्धेय छत्रपती शाहू जैसी विभूतीयों को यह समाज युगों युगों तक याद करेगा! राजवंश में जन्म लेने के बावजूद भी उनकी पूर्ण जीवन करोडो दलितों एवं पिछडो के सामाजिक एवं आर्थिक

उन्नती के लिए समर्पित रहा तथा उन्होने आज से ९० वर्ष पुर्व दलितों एवं निर्बलों के लिए राजकीय सेवाओं में ५० प्रतिशत स्थान सुरक्षित कर सामाजिक न्याय के आंदोलन का सुत्रपात किया था। उन्होने यथास्थितिवादी ताकतों द्वारा प्राणघातक हमलों के बावजूद जिंदगीभर अपने संकल्प को जीवित रखा। आज देश के राजनीतिक क्षितिज पर फिर से सामाजिक न्याय के आंदोलन की आवश्यक है। राजर्षी छत्रपती शाहूजी की प्रेरणा, संपूर्ण समाज को सामाजिक न्याय के इस आंदोलन को और गतिमान करने की शक्ती देती रहेगी।"

सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यामधील सर्वात मोठा अडसर म्हणजे जातीव्यवस्था होय. जगातील कोणत्याही देशात जातीव्यवस्था अस्तित्वात नाही, परंतु ती भारतात आहे हे लक्षात आणून देताना शाहू महाराज म्हणतात 'आमच्याकडे आहे त्या प्रकारचा जातिभेद दुनियेत कोठेही सापडायना नाही. त्यायोगाने पुढारलेल्या थोड्या लोकांच्या हाती सर्व सत्ता जाऊन त्यांची एक ऑलिगार्कीय झालीआहे व बहुजन समाजाला शक्य तितकी मदत होत नसून त्यांच्या हिताकडे व सुधारणेकडे दुर्लक्ष होत आहे.

'बहुजन समाजवाद' ही संकल्पना स्पष्ट करताना तुकाराम नाईक म्हणतात, 'जन्मावरुन जाती झाल्या त्यामुळे उच्चवर्गीय जातीने शिक्षण व धार्मिक सत्ता आपल्याच हाती ठेवली व तो बहुजन समाजावर सत्ता गाजवू लागला. यातला भिक्षूक-पुरोहित वर्ग हा बहुजन समाजाचा शोषक वर्ग होय. असा हा शोषक वर्ग म्हणजे ब्राह्मण वर्गच आहे असे म्हणता येणार नाही म्हणून ब्राह्मणांमधील अडाणी, दरिद्री, मागासलेल्या वर्गाला-रूढीच्या बंधनात जखडून, पिळवणूक करणारा जो पुरोहित वर्ग आहे. निव्वळ त्याविरुद्ध लढा म्हणजे बहुजन समाजवाद असे म्हणता येणार नाही तर भांडवलदार, जमीनदार, सावकार व आपल्या हातात सत्ता ठेवून जनतेचे शोषण करणारा असा जो धनिक वर्ग आहे. तोही या बहुजन समाजाच्या पिळवणूकीतला घटक आहेत! म्हणजे राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील सत्ता मुठभर पुढारलेला अल्पसंख्य वर्ग आपल्याच हातात ठेवून जनतेच्या शोषणावर जगत असतो व अशावेळी बहुजन समाजाच्या मानवी हक्कासाठी झगडा द्यावा लागतो, तो बहुजन समाजवाद होय.

सामाजिक न्याय प्रस्थापित करताना दुर्बल समाज घटकास विशेष संरक्षण द्यावयास हवे हे स्पष्ट करताना समाजशास्त्राचे अभ्यासक डॉ. गुरुनाथ नाडगोंडे म्हणतात, "समाजातील अतिदुर्बल व सर्वच दृष्टीने मागासलेला वर्ग म्हणजे दलितवर्ग आहे. हा वर्ग कित्येक शतके दबलेला आहे. यांच्या वाट्याला लाचारीचे जीवन आलेले आहे. माणूस म्हणून जगणेही या वर्गाला शक्य झालेले नाही. ना मान ना प्रतिष्ठा, ना खायला ना प्यायला अशा तऱ्हेचे जीवन जगणारा वर्ग नरक यातना भोगत होता. त्यांच्या दुःखाला सीमा नाही. त्यांचे हे मागासलेपण पिढ्यानपिढ्याचे आहे. म्हणूनच त्यांना संरक्षणाची गरज आहे. सामाजिक न्याय हा समाजातील सर्वच थरातील व्यक्तींना लाभावयास

हवा."

राजर्षी शाहू महाराज यांनी अस्पश्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सर्वसमावेशक प्रयत्न केले. यासंबंधी विवेचन करताना कृ.गो. सुर्यवंशी म्हणतात, "अस्पृश्यांच्या मनाला जडलेला पारंपारिक हीनगंड नष्ट करणे, इतराप्रमाणे आपणही माणूस आहोत असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण करण, शिवाशिव पाळण्याच्या पद्धतीचे बोचरे कंगोरे यांचे निरसण करणे, अस्पृश्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार जातीने करणे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांच्या ठायी प्रतिष्ठेची प्राणप्रतिष्ठा करणे, त्यांची अस्मिता जागृत करणे, त्यांना हक्काची जाणीव करुन देणे आणि हक्क संपादनासाठी संघटितपणे झुंज देण्यास उद्युक्त करणे, प्रतिष्ठित व्यवसायाच्या आणि नोकऱ्यांच्या प्रांतात त्यांचा शिरकाव करुन देणे. उद्योगधंद्याची आणि नोकरीचाकरीची सर्व क्षेत्रे त्यांच्या कर्तबगारीस वाव मिळावा म्हणून खुली करणे, अस्पृश्यतेच्या संदर्भात प्रतिबंधात्मक प्रशासकीय कारवाई करणे, कायदेकानून करणे, गुन्हेगारी समजण्याची आणि हजेरी देण्याची चाल बंद करणे, महारवतनादी वतने बंद करणे इत्यादी गोष्टी शाहूंना पार पाडावयाच्या होत्या."

आरक्षण नीतीचा अवलंब करुनही खऱ्या अर्थाने समग्र समाज परिवर्तन व सामाजिक न्यायाचे तत्व प्रस्थापित होऊ शकले नाही. अद्यापही बहुसंख्य मागासवर्गीयांमध्ये आरक्षणाचा लाभ घेण्याची कुवत विकसीत झालेली नाही. त्यांच्यातील दुर्बलता लक्षात घेता आरक्षण चालू ठेवणे न्यायपूर्ण ठरते. याअनुषंगाने राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने ४६९ व्या अहवालात मागासवर्गीयांबाबत दिलेली माहिती त्यांच्या भीषण वास्तवतेचे दर्शन घडविणारी आहे. "१९९९-२००० या वर्षात ग्रामीण भागात दारिद्र्यरेषेखाली असलेल्या ओबीसीतील लोकांचे प्रमाण ३४ टक्के, अनुसूचित जातीतील लोकांचे प्रमाण ४१ टक्के आणि अनुसूचित जमातील लोकांचे प्रमाण ५१ टक्के आहे. शहरी भागात दारिद्र्यरेषेखाली असलेले अनुसूचित जाती जमातीतील लोकांचे प्रमाण ४३ टक्के असून ओबीसीमधील लोकांचे प्रमाण ३६ टक्के आहे."

जपानमधील सामुराई लोकांनी जन्माने मिळणारा उच्च दर्जा सोडून दिला. ज्यामुळे जपानमध्ये एकात्म भावना विकसित झाली आणि त्या देशाची अल्पावधीत उन्नती घडून आली. तसेच भारतीय समाजाने आपल्या समाज मनातील जाति भेदाची विषवल्ली संपुष्टात आणली पाहिजे. याबाबत मानगाव येथे २२ मार्च १९२० रोजी आयोजित केलेल्या अस्पृश्य वर्गाच्या परिषदेमध्ये शाहू महाराज आपल्या भाषणात म्हणाले, "इतर कोणत्याही देशात मनुष्यात जात नाही, परंतु दुर्दैवाने हिंदुस्थानात मात्र जातिभेद इतका तीव्र आहे की, मांजर, कुत्रे किंबहुना शेणापेक्षा कमी अशाप्रमाणे आम्ही आपल्या देश बांधवास व भगिनीस वागविता....तोडाने बडबडणारे पुढारी आम्हास नको आहेत.

जातीय भावनेपलीकडे जाऊन राष्ट्रीय दृष्टीकोनासून विचार करावयास हवा हे सुचित

करताना प्रा. सुहास पळशीकर लिहितात, "राखीव जागांचा सामाजिक हेतू लक्षात घ्यायला हवा. तरच पांढरपेशा दिवाणखाण्यातील टवाळीचा सूर थांबेल आणि राखीव जागांच्या विरोधकांविषयीचा पुरोगामी वर्तुळातील हेटाळणीचा आवेश कमी होईल. टवाळणी आणि हेटाळणीच्या पलीकडे गेल्यानंतरच सामाजिक हित व सामाजिक परिवर्तन साधू शकते."

केवळ आर्थिक निकषावरुन नव्हे तर जातीच्या आधारे भारतीय राज्यघटनेमध्ये आरक्षणाची तरतूद केली आहे. ही बाब समर्थनीय ठरते हे लक्षात आणून देताना डॉ. भास्कर भोळे म्हणतात, "जगभराच्या सकारात्मक भेदभावात एका बाबतीत मात्र साधर्म्य असते ती बाब अशी की, सकारात्मक भेदभाव कधीच केवळ आर्थिक आधारावर केला जात नाही. गरिबीच्या जोडीला वंश, जात किंवा तत्सम एखादा घटक त्या भेदभावासाठी कारणीभूत असावा लागतो तरच तो भेदभाव समर्थनीय ठरतो. केवळ दारिद्र्य नव्हे तर दारिद्र्य हे जिचा परिणाम आहे अशी अंगभूत आणि जन्मसिद्ध अपात्रता ज्या समाज घटकाच्या ठिकाणी परंपरेने निर्माण केलेली असते तेच सकारात्मक भेदभावाला पात्र ठरतात..... समाजाने ज्या समुदायाला तुच्छ ठरवून दूर ठेवले, त्यांचे शोषण केले आणि त्यांचे रास्त हक्क नाकारले, त्यांच्या मागासलेपणाची जबाबदारी संपूर्ण समाजाची असते हे मान्य केले पाहिजे. वंचित समाज घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करण्यामध्ये अग्रेसर असलेल्या व समाज मान्यता पावलेल्या कानपूर येथील 'अखिल भारवर्षीय कूर्मि क्षत्रिय महासभेने' १९ ते २१ एप्रिल १९१९ मध्ये भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद शाहू महाराजांना दिले आणि त्यांच्या कार्याच्या गौरवार्थ 'राजर्षी' ही पदवी मोठ्या निष्ठेने व आत्मीयतेने बहाल केली. याचा तुम्हा-आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो. वर्तमान काळात आर्थिक समद्धी होत आहे. या समृद्धीबरोबरच मानवतेचा विकास घडून यावयास हवा. परंतू आपण संकुचित मनोवृत्तीचे बनत आहोत. याबाबत दलाई लामा यांची 'लक्ष द्या.... वाटलं तर बदला..... किंवा विसरुन जा.......' भावपूर्ण कविता मार्मिक व अर्थपूर्ण वाटते. ते म्हणतात,

"आपल्या काळात..... इमारतीची उंची वाढली पण
माणूसकीची कमी झाली
रस्ते रुंद झाले पण दृष्टी अरुंद झाली
खर्च वाढला आणि शिल्लक कमी झाली
घरे मोठी पण कुटूंबे छोटी झाली.

या कवितेमधील भावपूर्ण आशयापासून बोध घेऊन आपली भावना विचार व कर्तृत्व अधिकाधिक उदात्त व मानवीय बनविणे गरजेचे आहे. प्रस्तुत विवेचनावरुन निश्चित झालेली मते निष्कर्षाच्या स्वरुपात मांडता येतील. १) राजर्षी शाहू महाराज यांनी जन्मास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून सन्मानाने जीवन जगण्याचा अधिकार, संधी प्राप्त झाली पाहिजे. या

जाणिवेतून विचार मांडले. विचाराला अनुसरून प्रभावीपणे कार्य केले. म्हणूनच त्यांच्या विचार कार्याचा प्रभाव आजही टिकून असलेला आढळतो. २) २६ जुलै १९०२ पासून राजर्षी शाहू महाराजांनी नोकऱ्यांमध्ये ५०% आरक्षण लागू केले. वंचित समाज घटकांच्या उन्नतीसाठी आरक्षण हा न्यायपूर्ण, सनदशी मार्ग ठरतो असे त्यांचे आरक्षण धोरण होते. ३) भारतीय समाज व्यवस्थेचे अधिष्ठान जातीव्यवस्था आहे. ऐतिहासिक दृष्टीकोनातून विचार करता कनिष्ठ जातीतील लोकांना सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा इत्यादी पासून वंचित ठेवण्यात आले.

समाजातील दारिद्र्य, विषमता, शोषण, उपेक्षितपणा हे येथील जातीव्यवस्था, भांडवली व्यवस्था आणि सरंजामी व्यवस्थेचे परिणाम आहेत. सामाजिक न्याय, समता, माणूसकी, स्वातंत्र्य, बंधुत्व भावना यासारख्या शाश्वत मानवीय मुल्यांद्वारे समातप्रधान समाज निर्माण करण्याचा आरक्षण हा एक प्रभावी मार्ग आहे. आरक्षणाबरोबरच वंचित समाज घटकांना सर्वसमावेशक संरक्षण देणे उपयुक्त व परिणामकारक ठरते. तेव्हा आरक्षणाला विरोध न करता सर्वांनी स्वीकार करणे हे व्यक्ती, समाज व राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरते.

## संदर्भ सूची :-

१) फाटक न.रा. १९७२ श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला-पुष्प ३ रे, कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ, पृ. २

२) संगवे विलास २००१ राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूर : एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, प.१

३) साळूंके, हिंदुराज १९८५ छत्रपती शाहू महाराज यांच्या आठवण, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन्स प. १

४) साळूंखे, पी.बी. (संपा) १९८८ राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई : शिक्षण व सेवायोजन विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, प. १२

५) येडेकर, श्याम (संपा) १९७१ राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे, कोल्हापूर : मंगल प्रकाशन, प्र. ८

६) वर्मा, ब्रजलाल (संपा) १९९२, सामाजिक क्रांति के सुत्रधार कोल्हापूर नरेश छत्रपती शाहू : संघर्ष एवं सृजन, कानपूर : अखिल भारतवर्षीय कूर्मी क्षत्रिय महासभा, पृ. १

९) नाईक, तुकाराम १९७४ छत्रपती राजर्षी शाहू महाराज, कोल्हापूर : युनिव्हर्सल पब्लिकेशन, पृ. ६१

१०) कुंभार, नागोराव २००७ आरक्षण का व कसे? लातूर : प्रबोधन प्रकाशन, पृ.१

# सावित्रीबाई फुले आणि स्त्रीमुक्ती चळवळ - एक समाजशास्त्रीय अभ्यास

**डॉ. विलास भगवानराव भिल्लारे**
समाजशास्त्र विभाग,
नवगण शिक्षण संस्था राजूरीचे कला व विज्ञान
महाविद्यालय, चौसाळा, जि. बीड

10 **Research Paper - Sociology**

१९ व्या शतकाला भारताच्या इतिहासामध्ये महत्वाचे स्थान आहे कारण १९ वे शतक म्हणजे अनेक महत्त्वाची सामाजिक व राजकिय स्थित्यंतरे घडुन आलेला काळ होय. या शतकामध्ये शेकडो वर्षापासून चालत आलेल्या जातीप्रथा, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य, स्त्री-पुरुष भेद, पंथभेद, सामाजिक गुलामगिरी, निरिक्षरता अशा समस्या विरुद्ध लढा सुरु झाला. समाजातील स्त्रीच्या अस्तीत्वाची दखल या शतकाने घेतली. त्यामुळेच १९ वे शतक म्हणजे प्रबोधनाचे युग असे मानले जाते. महात्मा फुले यांच्या सुधारणावादी कार्यात सावित्रीबाई फुले यांची कामगिरी अत्यंत महत्वाची आहे. भारताच्या स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय या तत्वावर समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी संपुर्ण आयुष्य खर्ची केले. आधुनिक भारताच्या युगनायिका म्हणुन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य उल्लेखनीय ठरते. मानवाच्या मुक्ती लढ्याची सुरुवात त्यांनी त्यांच्या पासून केली. सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या सहकार्याने युगप्रवर्तक कार्य केले. स्त्री शुद्रातिशूद्रांच्या दु:खात एकरूप होणारे हे पहिले भारतीय दांपत्य होय.

सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची प्रेरणा घेवून अनेक स्त्रियांनी योगदान दिलेले आहे. आज स्त्रीयांना जी प्रतिष्ठा प्राप्त होवून त्या विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करित आहेत त्या विविध क्षेत्राच्या प्रगतीच्या दिशा प्रथमत: सावित्रीबाईनी खुल्या केल्या म्हणून आजच्या स्त्रीयांच्या प्रगतीमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा व कार्याचा अत्यंत महत्वपुर्ण असा वाटा आहे असे गृहित धरुन त्यांच्या विचार व कार्याचा अभ्यास करण्याच्या हेतूने प्रस्तुत शोध निबंधाचे लेखन केले आहे.

सावित्रीबाईचा जन्म ०३ जानेवारी १८३१ रोजी सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील नायगाव या खेडेगावी झाला. सावित्रीबाईचे वडील खंडोजी पाटील व लक्ष्मीबाई या दांपत्याला एकूण चार आपत्य होती. त्यातील सावित्रीबाई या खंडोजी पाटील यांच्या जेष्ठ कन्या होत्या. वडील गावचे पाटील असल्याने गोरगरीब, अडले नडलेल्या जनतेचे श्रद्धास्थान होते. वडीलाकडुनच सावित्रीबाईना

व्यवहार वृत्ती, समता दृष्टी, कष्टाळू निती, न्याय निवाड्याचे धडे मिळाले. इ. स. १८४० पासून सतत जोतीरावांना सावलीप्रमाणे साथ देणारी सावित्रीबाई या आदर्श वैवाहिक जीवनाचे श्रेष्ठतम प्रतिक होय. ज्योतिबा फुले यांनी १९ व्या शतकातील सर्व समस्याचे मुळ हे जातीसंख्या आहे असे मानुन ती मोडीत काढण्यासाठी स्त्री व शुद्रांना शिक्षित केले पाहिजे या उद्देशाने त्यांनी स्त्री शिक्षण चळवळ ही आपल्या घरापासून सुरु केली. सावित्रीबाई फुले यांना प्रथम त्यांनी साक्षर केले. इ.स. १८४९ मध्ये सावित्रीबाईनी अध्यापनाचे प्रशिक्षण घेवून पुण्यात परत आल्या त्यामुळेच सावित्रीबाई या आद्य भारतीय शिक्षीका होय. त्यांनी स्त्री शिक्षणाच्या अध्यापनाकरिता घराबाहेर टाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होय.

**स्त्री-शिक्षणाचे क्रांतीकार्य :-**

समाजातील सर्व समस्या, अनिष्टप्रथा, अंधश्रद्धा, रुढीपरंपरा, अज्ञान, दारिद्र्य यांचे मुळस्थान म्हणजे जातीसंख्या असुन ती नष्ट करण्यासाठी स्त्रीयांना, शुद्रांना प्रथमतः शिक्षीत केले पाहिजे हे जोतिबा फुले यांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी स्त्रीशिक्षणाचा अभिनव प्रयोग आपल्या मळ्यातील झाडाखाली सुरु करुन आपले स्त्रीशिक्षणाचे उद्दिष्ट्य सावित्रीबाई समोर ठेवून त्यांनी अनंत अडचणीवर मात करुन, अपमान, अवमान सहन करत प्रसंगी दगड, चिखल, शेण यांचा मार सहन करत सावित्रीबाईनी शैक्षणिक क्षेत्रात पाऊल ठेवले. स्त्रीच्या मनातील मानसिक दुर्बलतेचा न्युनगंड दुर करण्याकरिता शिक्षणाचा मार्ग दाखविला. महात्मा फुले यांनी सुरु केलेले स्त्री शिक्षणाचे कार्य सावित्रीबाईनी मोठ्या हिंमतीने, हट्टाने, प्रखर विरोधाला न जुमानता पुर्णत्वास नेले. आज अनेक क्षेत्रे स्त्रीयांच्या कार्य प्रतिभेने उजळून निघाली आहेत पण या अनेक स्त्रीयांच्या कर्तृत्वाचा जन्म सावित्रीबाई फुलेंच्या व्यक्तीमत्वातून पुढे आला हे मान्य करावे लागेल.

इ.स. १८४८ ते इ.स. १८५२ या काळामध्ये जोतिबा व सावित्रीबाई फुले या दांपत्यानी एकुण १८ शाळा चालविल्या. त्यामुळे सावित्रीबाईच्या कामाचा व्याप वाढला या काळात अनेक चांगले सहकारी त्यांना भेटले.

**स्त्रीमुक्ती व उद्धाराचे कार्य :-**

आधुनिक भारतातील पहिली शिक्षिका, आपल्या घरामध्येच अनाथ बालकाश्रम सुरु करणाऱ्या, समाजातील सर्व जाती धर्माच्या स्त्रीयांसाठी एकत्र हळदी कुंकू समारंभ आयोजित करणाऱ्या, अस्पृश्यासाठी घरातील पाण्याचा हौद खुला करणाऱ्या, सावित्रीबाईचे कार्य अतुलनिय होय. स्त्री-शुद्राचे दुःख दूर करण्यासाठी त्या आपल्या पती सोबत जिद्दीने लढल्या. १९ व्या शतकातमध्ये समाजातील ज्या अनिष्टप्रथा, बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, विधवा जीवन याविषयी त्यांच्या मनात अत्यंत चिड होती. विधवेचे जीवन अत्यंत अपमानीत, क्लेशदायक असे होते यातून विधवांची सुटका करण्यासाठी फुले दांपत्यानी विधवा पुनर्विवाहाचे प्रयत्न केले. बालहत्या प्रतिबंधक गृहाची

**बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना :-**

इ.स. १८६३ मध्ये फुले दांपत्यानी स्वत:च्या घरामध्ये बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले हे गृह फक्त ब्राह्मण विधवासाठीच सुरु करण्यात आले होते. यामध्ये सावित्रीबाई फुले यांचा फार मोठा सहभाग असल्याचा खुलासा महात्मा फुले यांनी सरकारच्या सचिवाला दिलेल्या पत्रामध्ये केलेला आहे. बालहत्या प्रतिबंधक गृहामध्ये एकुण चार सूईणी होत्या. सावित्रीबाई या बालहत्या प्रतिबंधक गृहामध्ये सुईणीचे काम करीत होत्या. या गृहाच्या स्थापना काळापासून म्हणजेच इ.स. १८६३ ते १८८४ पर्यत या गृहामध्ये एकुण ३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे सावित्रीबाईनी केली. विशेष म्हणजे हे बालहत्या प्रतिबंधक गृह सावित्रीबाई स्वआर्थिक सहाय्याद्वारे चालवित होत्या. कुठलेही सरकारी अनुदान नसलेले गृह त्याकाळामध्ये समाजातील अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरले.

पुण्यातील ब्राह्मण सनातन्याच्या गुहेमध्ये परिवर्तनाचा दिवा प्रज्वलीत करणारे हे कार्य सामाजिकदृष्ट्या खुप मोठे होते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी अनाथ विधवांच्या जगण्याचा प्रश्नच सोडविला नाही तर त्यांना जगण्याचा नवा अर्थ प्राप्त करुन दिला.

**बालविवाह विरोध :-**

प्राचीन काळापासून महाराष्ट्रामध्ये बालविवाहाची अनिष्ट प्रथा पुर्वापार चालत आलेली होती. महाराष्ट्रामध्ये हि अनिष्ट प्रथा समाजाच्या सर्व घटकामध्ये प्रचलित होती. विवाहाच्या वेळी मुला-मुलींचा बौद्धिक विकास होत नव्हता. बालवयामध्ये मुला-मुलींचा शारिरीक, मानसिक, बौद्धिक विकास होत नाही हे फुले दांपत्यानी आपल्या विचारातून समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. शारिरीक विकास न झाल्यामुळेच बालविवाहातून विधवांची संख्या वाढत असे, अनेक शारिरीक व्याधीना स्त्रीयांना तोंड द्यावे लागत होते. विधवांच्या समस्या सोडविण्यासाठी फुले दापंत्यांनी बालविवाह प्रथेला विरोध केला.

**विधवा पुनर्विवाह सभा :-**

महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी समाजामध्ये पुर्वापार काळापासून चालत आलेल्या अनिष्ट प्रथातील सती प्रथा, बालविवाह, केशवपन, विधवा जीवन या प्रश्नांना वाट करुन देण्यासाठी विधवा पुनर्विवाह सभेची स्थापना केली. सावित्रीबाईना जोतीरावानी प्रचंड असा आत्मविश्वास दिला त्यामुळेच त्यांनी अत्यंत कणखरपणे तत्कालीन समाजाच्या अवहेलनात्मक टिकेला अत्यंत खंबीरपणे तोंड दिले.

**अस्पृश्यता निवारण :-**

अस्पृश्य म्हणजे स्पर्श करण्यास अयोग्य असलेले मनुष्य होय. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी फुले दांपत्यांनी केलेले कार्य युगप्रवर्तक आहे. पेशव्यांच्या काळात पुण्यामध्ये अस्पृश्यांना साधे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन दिले नव्हते. त्याकाळामध्ये फुले दांपत्यांनी मनुष्यधर्म सांगितला.

RNI. MAHMUL02805/2010/33461
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XXIII, Vol. III, Jan. 2021 To June 2021 56
Interlink Research Analysis

स्थापना केली. आपल्या घरामध्ये अनाथ बालकाश्रम चालवून, त्या अनाथ मुलांच्या माता झाल्या. सावित्रीबाईनी स्त्रीयांना शिक्षणांची दारे खुली केली. स्त्री पुरुष समानता प्रथमत: त्यांनीच स्पष्टपणे मांडले. म्हणुनच सावित्रीबाई या स्त्रीमुक्ती अंदोलनाच्या आद्यप्रवर्तक ठरतात.

**महिला सेवा मंडळ :-**

इ.स. १८५२ साली स्त्रियांमध्ये सुधारणा करण्यासाठी महात्मा जोतिबा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सेवा मंडळाची स्थापना करण्यात येवून सावित्रीबाईनी पदाची अपेक्षा न करता तत्कालीन पुणे येथील कलेक्टरची पत्नी जोन्सबाईच्या अध्यक्षेतेखाली स्थापना केली. हि संस्था म्हणजे स्त्रियांच्या प्रगतीसाठी झटणारी पहिली संस्था होय. त्याहीपेक्षा मोठे कार्य म्हणजे या संस्थेची स्थापना एका बहुजन स्त्रीने करणे होय. या संदर्भात हरी नरके एक नामवंत विचारवंत यांनी आपल्या लेखामध्ये म्हटले की," सावित्रीबाईनी शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हिच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होय."

वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनी महिला सेवा मंडळाची स्थापना केली. या मंडळाने विधवा पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी, प्रौढ स्त्रियांचे शिक्षण, सर्व जातीधर्माच्या स्त्रीयांना आमंत्रित करुन हळदी कुंकू, तिळगुळ कार्यक्रम घेतले. व्यसनाच्या अधिन गेलेल्या पुरुषांच्या जाचातून स्त्रीमुक्ती करण्याचाही प्रयत्न हे महिला सेवा मंडळ करीत असे. सावित्रीबाई फुले व महात्मा फुले यांनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेवून एका महान कार्यास प्रारंभ केला. त्यांना खुप त्रास, अपमान, अवहेलना यांना सामोरे जावे लागले ज्यांनी त्यांना त्रास दिला त्यांना त्या म्हणत की, लहान थोर बंधुनो मी आपल्या भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करित आहे. मला उत्तेजन देण्यासाठी आपण माझ्यावर दगड, चिखल, शेण फेकत नसुन फुले उधळीत आहात, असे मी मानते.

**जातिभेद निर्मुलन :**

भारतीय समाज हा धर्म, भाषा, प्रांत, वर्णव्यवस्था, जातीप्रथा इत्यादीमध्ये विभागलेला होता. तत्कालीन समाजामध्ये जातीभेद पराकोटीला पोहचला होता. जातीभेदामुळे समाजाची प्रगती होत नव्हती. त्यामुळे स्त्रीयांचे जीवन हे अत्यंत कष्टमय बनले होते. समाजाचा आर्धाभाग असलेल्या स्त्रीयांना सनातनी व कर्मट समाजाने बंदिस्त केले होते. भारतीय समाजव्यवस्था ही प्राचीन रुढी, परंपरा, प्रथा, अनिष्ट चालीरिती यांना चिटकून राहिली. तत्कालीन स्त्रीयांनी बंधनाचे साखळदंड तोडण्याचा प्रयत्न केला नाही.

जातीव्यवस्थेची निर्मिती आर्यभट्टांनी स्वत:च्या स्वार्थासाठी केली असे मत फुले दांपत्याचे होते. त्यामुळे सावित्रीबाईनी महिला सेवा मंडळाच्या माध्यमातून जातीव्यवस्थेच्या भिंतीचे अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. हळदी कुंकू, प्रौढ शिक्षण या कार्यातून सावित्रीबाईनी समाजक्रांतीची सुरुवात केली.

सावित्रीबाई फुले यांनी जातीभेद निर्मुलनाबरोबरच अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हाती घेतले होते. त्यांच्यामध्ये महार, मांग, चांभार यांचे पूर्वज व आपले सर्वांचे पुर्वज एकच आहेत. त्यामुळे त्यांना समानतेने व माणुसकिने वागविले पाहिजे. अस्पृश्य समाज बांधव पाण्यासाठी भटकत होता. यावर उपाय म्हणून सावित्रीबाईनी स्वतःच्या मालकीची विहिर इ.स. १८६८ साली सर्व अस्पृश्य, अबालवृद्धासाठी पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून सर्वासाठी खुली केली. पुढे २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चवदार तळ्याचे आंदोलन केले त्याची दिशा व पार्श्वभुमी सावित्रीबाई फुलेनी तयार केली होती.

**सत्यशोधक समाजाचे नेतृत्त्व :-**

२४ सप्टेंबर १८७३ रोजी जोतीबा फुले यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सावित्रीबाई या सत्यशोधक समाजाच्या प्रमुख आधारस्तंभ होत्या. एक निःस्वार्थी व उत्साही कार्यकर्त्या म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. महात्मा जोतीबा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे नेतृत्त्व समर्थपणे सांभाळणा-या त्या एक समर्थ नेत्या होत्या. सावित्रीबाईनी सर्व संकटांशी सामना करीत, अनेक संकटांना तोंड देत, अनंत आर्थिक अडचणीचा मुकाबला करीत जोतीबा फुले यांचे कार्य शेवटपर्यंत त्यांनी पुढे नेले. महात्मा फुलेंच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाची धुरा अत्यंत यशस्वीपणे सांभाळली होती.

इ.स. १८९३ साली सावित्रीबाईनी सत्यशोधक समाजाचा २० वा वर्धापन दिन साजरा केला. जून्नर, इंदापूर भागामध्ये सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन केलेल्या होत्या. अहमदनगर, ओतूर, कोकण, मुंबई, ठाणे, विदर्भ, धुळे, तसेच मराठवाड्यामध्ये सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापन करण्यासाठी महत्वपुर्ण योगदान दिले होते.

आजच्या स्त्री जीवनाच्या विकासाची पायाभरणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी केलेली आहे. २१ व्या शतकामध्ये स्त्रीयांनी सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक, सांस्कृतिक, संशोधन, साहित्य, क्रिडा, कला, मनोरंजन इ. क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात यश संपादन केल्याचे दिसते. आधुनिक काळात स्त्रीयांची प्रगती होत असतानाच काही नवीन समस्या उदयास आलेल्या आहेत. जसे अत्याचार, बलात्कार, हुंड्यासाठी छळ, स्त्रीभृणहत्या, छेडछाड या समस्यांचा उल्लेख करता येईल. आजच्या समस्यातून मुक्त होण्यासाठी सावित्रीबाईचे विचार व कार्य निश्चितच प्रेरणादायी आहेत असे वाटते.

## संदर्भ सूची :-

१) भारतीय इतिहासातील स्त्री आणि कर्तृत्व - डॉ. सुषमा देशपांडे
२) भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास - डॉ. अनिल कठारे
३) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ. साहेबराव गाठाळ
४) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ. अनिल कठारे
५) क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले - हरी नरके
६) महाराष्ट्रातील समाज सुधारक - डॉ. अनिल कठारे
७) स्त्री शिक्षणाची वाटचाल - डॉ. सरोजिनी बाबर